.nagpur

# NMC e NEWS LETTER

जून २०१८

/nmcngp/ /ngpnmc/ www.nmcnagpur.gov.in/ http://news.nmcnagpur.org/

## थोडक्यात

### महाराजबागजवळील नवीन डी.पी. रस्त्यावरून सुटणार 'आपली बस'

**परिवहन सभापतींनी बंटी कुकडे यांच्या हस्ते शुभारंभ: दोन फलाटावरून २३५ फेऱ्यांची सुरुवात**

महाराजबाग रोड आणि धीरन कन्या शाळा येथून सुटणाऱ्या शहर बसमुळे होणारी वाहतुकीची कोंडी लक्षात घेता मातृसेवा संघ ते महाराजबागच्या मागून अमरावती मार्गाला जोडणाऱ्या डी.पी. मार्गावरून उद्या २३ जून पासून विविध मार्गाच्या बसेस सुटतील. त्याचा शुभारंभ परिवहन समितीचे सभापती बंटी कुकडे यांच्या हस्ते शुक्रवारी (ता. २२) करण्यात आला.नागपूर शहर बसचे संचलन सध्या बर्डी येथील महाराजबाग रोड, मोरभवन आणि धीरन कन्या शाळेजवळून होते. मात्र, शहर बसच्या थांब्यामुळे होणारी वाहतूक कोंडी लक्षात घेऊन आता महाराजबाग मार्गावरून सुटणाऱ्या बस फेऱ्या नवीन डी.पी. मार्गावरून सुटतील. या मार्गावर विविध फलाट तयार करण्यात आले आहे. त्यापैकी फलाट क्र. ६ वरून विविध मार्गावरील सुमारे ११७ बसफेऱ्या आणि फलाट क्र, ७ वरून ११८ बस फेऱ्या सुटतील.

### महापौर नंदा जिचकार आयुक्त वीरेंद्र सिंह यांनी संयुक्त केली स्मार्ट सिटीच्या नगररचना परियोजनाची पाहणी

नागपूर स्मार्ट ॲण्ड सस्टेनेबल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेडच्या एरिया बेस्ड डेव्हलपमेंट अंतर्गत पुनापूर, भरतवाडा, पारडी येथे तयार करण्यात आलेल्या नगररचना परियोजनेची पाहणी महापौर नंदा जिचकार यांनी शुक्रवारी (ता.१५) सकाळी केली. यावेळी त्यांच्यासमवेत आयुक्त वीरेंद्र सिंह, नागपूर स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.रामनाथ सोनवणे, उपअभियंता राजेश दुफारे प्रामुख्याने उपस्थित होते.यावेळी मान्यवरांनी पारडी येथील शीतला माता मंदिराजवळ असलेल्या पाण्याच्या टाकीपासून पाहणी दौऱ्याला सुरवात केली. त्यानंतर भरतवाडा रोड, पुनापूर, भवानी माता मंदिर परिसरासमोरिल रस्ते, भंडारा रोडवरील रस्ते याची पाहणी मान्यवरांनी केली. सदर प्रकल्पाचा मंजूर नकाशा यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.रामनाथ सोनवणे यांनी महापौर आणि आयुक्त यांच्या समक्ष सादर केला. कामाला लवकरात लवकर चालना मिळावी यासाठी प्रयत्नरत राहवे, असे निर्देश महापौर नंदा जिचकार यांनी दिले.

### प्रवीण दटके यांनी घेतला बीओटी आणि पीपीपी प्रकल्पांचा आढावा

नागपूर महानगरपालिकेचे राज्य सरकार व केंद्र सरकारकडे प्रस्तावित असलेल्या बीओटी आणि पीपीपी प्रकल्पांचा आढावा माजी महापौर प्रवीण दटके यांनी शुक्रवारी (ता.२९) मनपा मुख्यालयातील डॉ.पंजाबराव देशमुख सभागृहात आयोजित बैठकीत घेतला.यावेळी स्थायी समिती सभापती वीरेंद्र कुकरेजा, स्थापत्य व समिती सभापती संजय बंगाले प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी महानगरपालिकेच्या प्रस्तावित ऑरेंज सिटी प्रकल्प, बुधवार बाजार महाल आणि सक्करदरा, महाल आणि डिग दवाखाना, डिपी रस्ता, दहनघाट, देवडिया दवाखाना, साई प्रकल्प, स्व.बाळासाहेब ठाकरे स्मारक, चिटणवीसपुरा इत्यादी प्रकल्पांचा आढावा यावेळी बैठकीत घेण्यात आला.

### मनपातील ४० सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार

नागपूर महानगरपालिकेच्या सेवेतून आज शनिवारी (३० जून) निवृत्त झालेल्या विविध विभागातील ४० कर्मचाऱ्यांचा सत्कार मनपा मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती सभागृहात करण्यात आला.सत्कार कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून निगम अधीक्षक राजन काळे, सहायक अधीक्षक (भविष्य निर्वाह निधी) दत्तात्रय डहाके, सहायक अधीक्षक (सामान्य प्रशासन विभाग) मनोज कर्णिक, सहायक अधीक्षक सुषमा ढोरे प्रामुख्याने उपस्थित होते. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मान्यवरांनी शाल, श्रीफळ, तुळशीचे रोपटे आणि भविष्य निर्वाह निधीचा धनादेश देऊन सत्कार केला. सत्कारमूर्तींमध्ये राजस्व निरीक्षक एस. ए. जाधव, उच्च श्रेणी लिपिक एम. एस. टाकतोडे, श्रीमती के. एम. चराटे, कनिष्ठ लिपिक एच. एच. बेले, बशीर खान लाल खान पठाण, आर.जी. इंगोले, एम.एस.डब्ल्यू. अल्ताफ खान वजीर खान, हवालदार मीर अबीद अली उस्मान अली, मालवाहक जमादार एस. एल. होले, ए.एन.एम. श्रीमती जी. एस. डगवार, चालक बी.डी. रामटेके, एम.एस. डब्ल्यू. आर. दुबे, मुख्याध्यापक श्रीमती सुनिता पहापळकर, श्रीमती प्रेरणा मुलकुलवार, श्रीमती खिलहत जहाँ अहमद खान, सहायक शिक्षिका श्रीमती रेखा शेंडे, सहायक शिक्षिका श्रीमती नंदा वालदे, श्रीमती खुर्शीद बेगम अन्सारी उर्फ आसीफ अख्तर यांचा समावेश होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, संचालन आणि आभार प्रदर्शन सहायक जनसंपर्क अधिकारी प्रदीप खर्डेनवीस यांनी केले.

## शिवाजी महाराजांच्या अनुकरणासाठी सेवेचे व्रत स्वीकारा : ना. नितीन गडकरी

**यशोधरा नगरातील शिवाजी चौकात छत्रपतींच्या पूर्णाकृती म्यूरलचे लोकार्पण**



छत्रपती शिवाजी महाराजांना यशवंत, कीर्तिवंत, सामर्थ्यवान जाणता राजा असे संबोधले जाते. पिता कसा असावा, राजा कसा असावा याचे आदर्श उदाहरण म्हणजे शिवाजी महाराज होय. या देशाचे पहिले धर्मनिरपेक्ष राजा म्हणून त्यांची ख्याती आहे. अशा राजाचे अनुकरण करायचे असेल तर आयुष्यात सेवेचे व्रत स्वीकारा, असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले.नागपूर महानगरपालिकेच्या वतीने यशोधरा नगर पोलिस ठाण्याजवळ योगी अरविंदनगर परिसरातील शिवाजी चौकात तयार करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती म्यूरल प्रतिमेचे लोकार्पण आज शनिवारी (ता. ३०) केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर नंदा जिचकार होत्या. राज्याचे ऊर्जामंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, उत्तर नागपूरचे आमदार डॉ. मिलिंद माने, आमदार सुधाकर कोहळे, मनपा स्थायी समितीचे सभापती वीरेंद्र कुकरेजा, मनपा आयुक्त वीरेंद्र सिंह, आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना ना. नितीन गडकरी म्हणाले, सर्व धर्मांचा सन्मान करणे, जात, धर्म, पंथ याही उपर जाऊन विचार करणे, ही आमची संस्कृती आहे. शिवाजी महाराजांचा आदर्श घेऊन आम्ही केंद्रात आणि राज्यात काम करीत आहोत. शोषित, वंचितांसाठी समाजातील दुर्बल घटकासाठी काम करीत आहोत म्हणूनच लोकांनी आमच्यावर विश्वास टाकला. नागपूरकर जनतेने निवडून दिल्यामुळे आज देशभरात रस्त्याचे जाळे तयार करीत आहोत. नागपूरच्या भविष्यासाठी मेट्रोचे काम करीत आहोत. नागपूर शहराचा वेगाने कायापालट होत आहे. हे करीत असताना या भागातील जनतेला आरोग्य सेवेचा लाभ देताना समाधान वाटते. मी सेवा कार्यालाच राजकारण मानतो. सहा हजारांपेक्षा अधिक लोकांच्या हृदयावर शस्त्रक्रिया, सुमारे एक लाख महिलांची स्तन कर्करोग तपासणी, त्यातील कर्करोग आढळून आलेल्या दोन हजार महिलांवर उपचार, देशभरातील १० करोड महिलांना गॅस कनेक्शन, नागपुरातील एक लाख २० हजार महिलांना त्याचा लाभ, हे सर्व करताना आनंद वाटतो. यातून वेगळे समाधान मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

महानगरपालिकेच्या शाळेचा निकाल ७४ टक्के

## गुणवंत विद्यार्थ्यांचा महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते सत्कार



राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने आज जाहीर केलेल्या दहावीच्या परीक्षेच्या निकालामध्ये नागपूर महानगरपालिकेच्या विद्यार्थ्यांनी बाजी मारली आहे. नागपूर महानगरपालिकेच्या सर्व शाळांचा निकाल ७४ टक्के इतका लागला आहे. महापौर नंदा जिचकार यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार शुक्रवारी (ता.८) मनपा मुख्यालयातील महापौर कार्यालयात केला.यावेळी महापौर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करीत त्यांना तुळशीचे रोपटे भेट म्हणून दिले. विद्यार्थ्यांच्या पुढील भविष्यासाठी त्यांना शुभेच्छाही दिल्या. मागील वर्षीच्या प्रमाणात मनपाच्या शाळेचा निकाल यावर्षी वाढला असल्याने त्यांनी शिक्षणाधिकारी संध्या मेडपल्लीवार आणि त्यांच्या सर्व शिक्षकांचे कौतुक केले.

## शहरातील अतिक्रमण, विद्रुपीकरण थांबवा

**आयुक्तांचे आवाहन : प्रतिसाद न दिल्यास दंडात्मक कारवाई**

शहराची स्वच्छता ही सर्वांचीच जबाबदारी आहे. शहराला आपले स्वतःचे समजून नागरिक व व्यवसायिकांनी कचरा डस्टबीनमध्येच टाकणे अपेक्षित आहे. परंतु, कचरा उघड्यावर टाकला जातो. शहराच्या विविध भागातील फुटपाथावर, दुकानांपुढे, व्यावसायिक इमारती, शासकीय कार्यालयांच्या परिसरात मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करण्यात आलेले आहे. सोबतच जाहिरातींसाठी सार्वजनिक व खासगी मालमत्तांचे विद्रुपीकरण केले जाते. शहर स्वच्छ, सुंदर व सुनियोजित ठेवण्यासाठी अतिक्रमण काढण्यासाठी पुढाकार घ्या, विद्रुपीकरण थांबवा असे आवाहन महापालिका आयुक्त वीरेंद्र सिंह यांनी केले. यासोबतच आवाहनाला प्रतिसाद न दिल्यास कायद्यानुसार दंडात्मक कारवाई करण्यास इशाराही त्यांनी दिला आहे. शहरातील अतिक्रमण, स्वच्छता, प्लास्टिक बंदी, अवैध होर्डिंग, सार्वजनिक व खासगी इमारतींचे विद्रुपीकरण आदी विषयासंदर्भात आयुक्तांनी सोमवारी पत्रकारांशी चर्चा करताना महापालिका प्रशासनाची भूमिका मांडली. यावेळी अपर आयुक्त रवींद्र कुंभारे, अतिरिक्त उपायुक्त जयंत दांडेगावकर उपस्थित होते. शहरातील फुटपाथवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करण्यात आले आहे. सोबतच व्यावसायिकांनी दुकानापुढे अतिक्रमण केले आहे. एवढेच नव्हे तर मॉल वा मोठ्या व्यावसायिक प्रतिष्ठानापुढे अतिक्रमण असल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे नागरिकांना फुटपाथचा वापर करता येत नाही.

रहदारीला अडथळा निर्माण होतो. निवासी भागातही अतिक्रमण करण्यात आलेले आहे. तसेच बाजार भागात या व्यावसायिक प्रतिष्ठानांच्या पार्किंगसाठी आरक्षित असलेल्या जागेचा वापर अन्य कारणांसाठी केला जातो. आरक्षित जागेचा वापर हा पार्किंगसाठी व्हावा, अन्यथा कारवाई करण्याचा इशारा आयुक्तांनी दिला.

मंगलतोरण, औक्षण आणि गुलाबपुष्पाने झाले

## विद्यार्थ्यांचे स्वागत

**शाळा प्रवेशोत्सव दिमाखात साजरा : पहिल्याच दिवशी मिळाले गणवेश आणि पुस्तके**



मंगलतोरण आणि रांगोळ्यांनी सजलेली शाळा, शाळेत येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांचे शिक्षकांनी केलेले औक्षण आणि गुलाबपुष्प देऊन केलेले स्वागत अशा मंगल वातावरणात महानगरपालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांनी शाळेत पहिले पाऊल ठेवले. पहिल्याच दिवशी मिळालेले गणवेश आणि पुस्तके मिळाल्याने विद्यार्थ्यांनी त्यांच्या शाळेत उपस्थित पाहुण्यांचे आणि सर्व शिक्षकांचे मनापासून आभार मानत कृतज्ञता व्यक्त केली.

निमित्त होते शाळेतील पहिल्या दिवसाचे. नागपूर महानगरपालिकेच्या सर्व शाळा मंगळवारपासून (ता. २६) सुरू झाल्या. यानिमित्ताने प्रत्येक शाळेत विद्यार्थ्यांचे आगळेवेगळे स्वागत करून 'प्रवेशोत्सव' साजरा करण्यात आला. प्रवेशोत्सवाचा मुख्य कार्यक्रम विवेकानंद उच्च प्राथमिक हिंदी शाळेत झाला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षक आमदार नागो गाणार, नागपूर महानगरपालिकेचे शिक्षण सभापती प्रा. दिलीप दिवे, क्रीडा समितीचे उपसभापती प्रमोद तभाने, शिक्षणाधिकारी संध्या मेडपल्लीवार उपस्थित होते.

यावेळी प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प, गणवेश आणि पुस्तके देऊन त्यांचे स्वागत केले. यावेळी बोलताना आमदार नागो गाणार म्हणाले, मनपाच्या शाळेचा दर्जा आणि शिक्षण अतिशय चांगले आहे. आपण स्वतः मनपाच्या शाळेतून शिक्षण घेतले. याच शाळेने आपल्याला अन्यायाविरुद्ध आणि सत्यासाठी लढण्याची शिकवण दिली. शिक्षणाने आपण चांगले व्यक्ती बनतो. शिक्षण आपल्या चालण्यातून, वागण्यातून, बोलण्यातून दिसायला हवा. शिक्षण घेऊनही जो व्यक्ती भ्रष्टाचार करतो, त्याच्या शिक्षणाला काहीच अर्थ नाही. अशा व्यक्तींवर संस्कार झालेले नसतात. मनपाच्या शाळेत शिक्षणासोबतच संस्कार होतात, ही अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले आणि सर्व विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक सत्रासाठी शुभेच्छा दिल्या.

## विकासकामाकरिता केलेले खड्डे तातडीने बुजविण्यात यावे : महापौर

**मेट्रो रेल्वे, नासुप्र, मनपाच्या समन्वयाने कामे करण्याचे निर्देश**



शहरात विविध संस्थांतर्गत विकास कामे सद्यपरिस्थितीत सुरू आहे. पावसाळा सुरू झाला आहे. चार जुलैपासून पावसाळी अधिवेशनही सुरु होत आहे. त्यापूर्वी शहरातील विकासकामाकरिता केलेले खड्डे तातडीने बुजविण्यात यावे, असे निर्देश महापौर नंदा जिचकार यांनी दिले.शहरातील विविध विकासकामाचा आढावा घेण्यासाठी महापौर नंदा जिचकार यांनी गुरूवारी (ता.२८) ला मनपा मुख्यालयातील डॉ.पंजाबराव देशमुख सभागृहात मेट्रो रेल्वे, नासुप्र, मनपा यांच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक पार पडली. शहरामध्ये सुरू असलेल्या सीमेंटच्या रस्त्यांचा आणि हॉटमिक्सच्या कामाचा झोननिहाय आढावा महापौर नंदा जिचकार यांनी कार्यकारी अभियंत्यांमार्फत घेतला. नागपूर मेट्रो रेल्वेच्या प्रगतीपथावर असलेल्या आणि पूर्ण झालेल्या कामाची स्थितीबाबत आढावा महापौरांनी मेट्रोच्या अधिकाऱ्यांकडून घेतला. मेट्रो रेल्वेने शहरात काम सुरु असताना मनपाच्या स्थानिक अधिकाऱ्यांशी संपर्क साधणे आवश्यक आहे. त्यांच्याशी समन्वय न साधल्याने मोठ्या समस्या निर्माण होत आहे. यासाठी सातत्याने सर्व विभागांत समन्वय असणे आवश्यक आहे. यानंतर मेट्रो रेल्वे मनपाच्या जलप्रदाय, आरोग्य, बांधकाम विभाग यांच्याशी समन्वय साधत काम करेल, असे निर्देश महापौर नंदा जिचकार यांनी दिले. ज्या भागात काम सुरु आहे, त्या भागातील नगरसेवक व झोन सहायक आयुक्तांना बांधकामाबाबत सूचित करावे, असे निर्देश महापौर नंदा जिचकार यांनी दिले. ४ जुलै पासून पावसाळी अधिवेशन सुरु होत आहे. त्यापूर्वी शहरातील सर्व खड्डे बुजविण्यात यावे, याशिवाय पावसाळा सुरू झाला आहे. नागरिकांच्या सातत्याने तक्रारी येत आहे, त्यामुळे खड्डे तातडीने बुजविण्यात यावे, असे निर्देश महापौर नंदा जिचकार यांनी दिले.

## मोक्षधाम पुलामुळे वाहतुकीची कोंडी सुटेल : महापौर



▲ पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पुलाचे लोकार्पण

मोक्षधाम ते सरदार पटेल चौक ग्रेट नाग रोड दरम्यान असलेल्या नाग नदीवर नव्याने बांधण्यात आलेल्या पुलाचे लोकार्पण गुरुवारी (ता. २८) महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते झाले.उपमहापौर दीपराज पार्डीकर, स्थायी समितीचे सभापती वीरेंद्र कुकरेजा, विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे, स्थापत्य समितीचे सभापती संजय बंगाले, जलप्रदाय समितीचे सभापती पिंटू झलके, धंतोली झोन सभापती विशाखा बांते, सत्तापक्ष प्रतोद दिव्या धुरडे, स्थायी समितीचे माजी सभापती संदीप जाधव, नगरसेवक विजय चुटेले, किशोर जिचकार, प्रमोद चिखले, नगरसेविका हर्षला साबळे, लता काडगाये, प्रभारी मुख्य अभियंता मनोज तालेवार, कार्यकारी अभियंता सतीश नेरळ, सहायक आयुक्त राजू भिवगडे, जनसंपर्क अधिकारी अशोक कोल्हटकर, कंत्राटदार मेडपल्लीवार, मनोज साबळे उपस्थित होते. महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते प्रारंभी कोनशिलेचे अनावरण करण्यात आले. यानंतर नवनिर्मित पुलाचे फीत कापून लोकार्पण करण्यात आले. लोकार्पणानंतर महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती व सर्व मान्यवरांनी पुलावरून पायी चालत पुलाचे निरीक्षण केले. याप्रसंगी बोलताना महापौर नंदा जिचकार म्हणाल्या, मोक्षधाम ते ग्रेट नाग रोड दरम्यान असलेल्या नागनदीवरील पुलाचे काम रखडल्याने नागरिकांना बराच त्रास झाला. विशेष प्रकल्प समितीचे अध्यक्ष प्रवीण दटके यांनी पुलाचे काम लवकरात लवकर व्हावे यासाठी विशेष प्रयत्न केलेत. आता हा पूल जनतेसाठी खुला झाल्याने या परिसरातील वाहतुकीतीची कोंडी सुटेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. भर पावसात झालेल्या लोकार्पण सोहळ्याला नागरिकांची उपस्थिती होती.

# थोडक्यात...



## मनपाद्वारे शिवाजी महाराजांच्या राज्यभिषेक दिनानिमित्त अभिवादन

महाराष्ट्राचे आराध्यदैत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त नागपूर महानगरपालिकेद्वारे अभिवादन करण्यात आले. शिवाजीनगर येथील उद्यानातील शिवाजी महाराजांच्या सिंहसनारूढ पुतळ्याला महापौर नंदा जिचकार आणि राजे मुधोजी भोसले यांनी पुष्पहार चढवून त्यांना अभिवादन केले.यावेळी स्थापत्य समिती सभापती संजय बंगाले, नगरसेविका रूपा राय, उज्वला शर्मा, नगरसेवक सुनील हिरणवार, रमेश मंत्री, श्रीकांत देशपांडे, अनिल हस्तक, मधुकर भालेराव, पांडुरंग क्षीरसागर, वनिता हस्तक, उत्तरा देशपांडे, गणेश गुल्लाड प्रामुख्याने उपस्थित होते.

## शासनाच्या योजना घराघरांपर्यंत पोहचविण्यासाठी कटिबद्ध : ना. सदाभाऊ खोत

**मनपाला सदिच्छा भेट : पदाधिकारी, नगरसेवकांसोबत साधला संवाद**

केंद्र शासन आणि राज्य शासनाने गेल्या चार वर्षात जनसामान्यांसाठी अनेक उपयोगी योजना राबविल्या. आम्ही कार्यकर्ता म्हणून त्या योजना लोकांपर्यंत पोहचविला. त्याचा लाभ लोकांना दिला. ह्या योजना आणि शासनाचे कार्य राज्यातील प्रत्येक घरापर्यंत पोहचविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. त्यादृष्टीने आमचे 'समर्थनासाठी संपर्क' अभियान सुरू असल्याचे प्रतिपादन कृषी राज्यमंत्री सदाभाऊ खोत यांनी केले.खरीप हंगाम आढावा बैठकीच्या निमित्ताने नागपुरात आलेल्या ना. सदाभाऊ खोत यांनी नागपूर महानगरपालिकेला सदिच्छा भेट दिली आणि पदाधिकारी तसेच भाजप नगरसेवकांशी संवाद साधला. यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.पुढे बोलताना ना. सदाभाऊ खोत म्हणाले, सरकारमध्ये काम करीत असताना मागील चार वर्षात जी-जी कामे केली ती घराघरांपर्यंत पोचविणे आवश्यक आहे. राज्य शासनाच्या एकूण २७ विकासात्मक योजनांचा आपण चार्ट तयार केला. ह्या योजना गावागावांत राबविण्याचा संकल्प केला. कामगार कल्याण मंडळाच्या माध्यमातून एकाच तालुक्यातून १६ हजार अर्ज आले. त्यांना या योजनांचा लाभ देऊ शकलो. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर ओरडणाऱ्यांना आपण जाब दिला. त्यांना शांत बसावे लागले. ज्यांचा शेतमाल मंडीमध्ये येतो त्यांना मतदानाचा अधिकार नव्हता. तो अधिकार आता त्यांना मिळाला आहे. अनेक चांगले निर्णय सरकारने घेतले. मुख्यमंत्री आरोग्य निधीच्या माध्यमातून अनेक रुग्णांना मोठा लाभ झाला. आपण स्वत: आजपर्यंत सुमारे सात कोटींची मदत मुख्यमंत्री आरोग्य निधीच्या माध्यमातून रुग्णांना मिळवून दिली. माझ्या बंगल्यातील ५० टक्के जागा रुग्णसेवेसाठी राखीव असल्याचे त्यांनी सांगितले.

## मनपाद्वारे हिवताप प्रतिरोध बाईक -रॅलीचे आयोजन

नागपूर महानगरपालिकेद्वारे जून २०१८ हा महिना हिवताप प्रतिरोध महिना म्हणून शासन निर्णायानुसार साजरा करण्यात येत आहे. याअंतर्गत मनपाच्या हिवताप व हत्तीरोग विभागामार्फत लक्ष्मीनगर झोनमध्ये बाईक रॅलीचे आयोजन मंगळवारी (ता.२६) ला करण्यात आले. कार्यकारी महापौर दीपराज पार्डीकर यांनी हिरवी झेंडी दाखवून रॅलीचा शुभारंभ केला.यावेळी लक्ष्मीनगर झोन सभापती प्रकाश भोयर, अग्निशमन समिती सभापती लहूकुमार बेहेते, मीनाक्षी तेलगोटे, पल्लवी श्यामकुळे, झोनल अधिकारी, रामभाऊ तिडके, उपअभियंता रवींद्र मुळे प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी हिवताप व हत्तीरोग या रोगाविषयी जनजागृती करण्यात आली. कार्यकारी महापौर दीपराज पार्डीकर यांनी सर्व उपपथकांच्या ३०० कर्मचा-यांना किटकजन्य आजाराबाबत प्रतिज्ञा दिली. त्यानंर बाईक रॅलीचा शुभारंभ झाला. ही रॅली लक्ष्मीनगर झोन कार्यालय, माटे चौक पेट्रोल पंप, अत्रे ले आऊट, तात्या टोपे नगर, सुरेंद्रनगर, देवनगर, अजनी, गजानन नगर, डॉक्टर कॉलनी, छत्रपतीनगर, ऑरेंज सिटी चौक, प्रतापनगर चौक, खामला चौक, सोमलवाडा, राजीव नगर, जयप्रकाश नगर, सहकार नगर, पन्नासे ले आऊट, इंद्रप्रस्थ नगर, गजानन मंदिर त्रीमूर्तीनगर, एम.आय.जी.कॉलनी, सुर्वेनगर, नेलको सोसायटी, सुभाषनगर या मार्गाने मार्गस्थ झाली. यावेळी परिसरातील नागरिकांमध्ये या रोगाविषयी जनजागृती करण्यात आली. जनजागृतीचे पोस्टर, स्टीकर, हस्तीपत्राचे वाटप करण्यात आले. या बाईक रॅलीचे आयोजन व नियोजन हिवताप व हत्तीरोग विभाग प्रमुख जयश्री थोटे यांच्या नेतृत्वात करण्यात आले.

# योग घराघरांत पोहचविण्याचा मनपाचा मानस : ना. चंद्रशेखर बावनकुळे


**विश्व योगदिनानिमित्त हजारो नागपूरकरांची सामूहिक योगसाधना -तीन वर्षांची बालिका आणि ९३ वर्षीय आजोबांचा सहभाग**

विश्व योग दिनाचे औचित्य साधून नागपुरात यशवंत स्टेडियमवर मनपातर्फे आयोजित कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पदाधिकारी उत्साही असतात. योग दिनाची चळवळ वृद्धिंगत करीत नागपुरातील घराघरांत योग पोहचविण्याचा मनपाचा मानस असल्याचे प्रतिपादन राज्याचे ऊर्जामंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.विश्व योग दिनाचे औचित्य साधून नागपूर महानगरपालिकेतर्फे विविध योगाभ्यासी मंडळ आणि संस्थांच्या सहकार्याने स्थानिक यशवंत स्टेडियम येथे आयोजित योग दिन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मंचावर उत्तर नागपूरचे आमदार डॉ. मिलिंद माने, कार्यकारी महापौर दीपराज पार्डीकर, स्थायी समितीचे सभापती वीरेंद्र कुकरेजा, विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे, विभागीय आयुक्त अनुपकुमार, मनपा आयुक्त वीरेंद्र सिंह, अतिरिक्त आयुक्त रवींद्र कुंभारे, भाजपचे प्रदेश संघटन मंत्री विजय पुराणिक, माजी महापौर तथा ज्येष्ठ नगरसेवक प्रवीण दटके, क्रीडा समितीचे सभापती नागेश सहारे, शिक्षण समितीचे सभापती प्रा. दिलीप दिवे, क्रीडा समितीचे उपसभापती प्रमोद तभाने, ज्येष्ठ नगरसेवक सुनील अग्रवाल, मंगळवारी झोन सभापती संगीता गिऱ्हे, नगरसेविका दिव्या धुरडे प्रामुख्याने उपस्थित होते. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे पुढे बोलताना म्हणाले, संयुक्त राष्ट्रसंघाने २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून घोषित केल्यापासून नागपुरात महापालिकेच्या पुढाकाराने दरवर्षी योग दिनाचे मोठे आयोजन होत असते. यानिमित्ताने 'सुदृढ आरोग्यासाठी योग' हा संदेश परिणामकारकरीत्या जनतेपर्यंत पोहोचत आहे. नागपुरातील सर्व योग्याभ्यासी मंडळ, ध्यान केंद्र, योग साधना केंद्र यांच्या मदतीने घराघरात आणि मनामनापर्यंत योग पोहचविण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे बहारदार संचालन ज्येष्ठ नगरसेवक दयाशंकर तिवारी यांनी केले. आभार शिक्षण सभापती प्रा. दिलीप दिवे यांनी मानले.

## व्यापारी-अधिकाऱ्यांच्या समन्वयातून एलबीटी वसुलीवर तोडगा : वीरेंद्र कुकरेजा

**थकीत एलबीटीसाठी मनपाच्या विशेष शिबिराचे उद्घाटन - नागविदर्भ चेंबर ऑफ कॉमर्सचा पुढाकार - २० ते २७ जून दरम्यान प्रकरणे निकाली काढण्याचा निर्धार**

स्थानिक संस्था करांतर्गत असलेली थकीत प्रकरणे निकाली काढणे क्लिष्ट काम आहे. व्यापाऱ्यांना विश्वासात घेऊन या प्रकरणांना सरळ मार्गाने संपुष्टात आणण्यासाठी व्यापाऱ्यांचे सहकार्य आवश्यक आहे. व्यापारी आणि अधिकाऱ्यांच्या समन्वयातून एलबीटीची संपूर्ण प्रकरणे निकालात काढू, असा विश्वास स्थायी समितीचे सभापती वीरेंद्र कुकरेजा यांनी व्यक्त केला.नागपूर महानगरपालिकेच्या वतीने एलबीटीची थकीत प्रकरणे निकालात काढण्यासाठी नागविदर्भ चेंबर ऑफ कॉमर्सच्या सहकार्याने सिव्हील लाईन स्थित त्यांच्या कार्यालयात विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मंचावर महिला व बालकल्याण समितीच्या सभापती प्रगती पाटील, नगरसेवक निशांत गांधी, सहायक आयुक्त (कर) मिलिंद मेश्राम, नागविदर्भ चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष हेमंत गांधी, माजी अध्यक्ष प्रकाश मेहाडिया उपस्थित होते. याप्रसंगी पुढे बोलताना सभापती वीरेंद्र कुकरेजा म्हणाले, मनपाच्या अर्थसंकल्पापूर्वी विविध व्यापारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांशी केलेल्या चर्चेनंतर त्यांच्याच पुढाकाराने सदर शिबिर लावण्यात आले. एलबीटी जेव्हा अस्तित्त्वात आला तेव्हा तो समजण्यात व्यापाऱ्यांनाही अडचणी गेल्या. त्यामुळेच प्रलंबित प्रकरणांची स्थिती उद्भवली. व्यापारी चुकीच्या भावनेने व्यवसाय करीत नाही, हे अधिकाऱ्यांनी ध्यानात ठेवून या शिबिराच्या माध्यमातून त्यांच्या अडचणी समजावून घ्याव्यात. त्यांची प्रलंबित प्रकरणे या शिबिरातच मिटवावी, असे निर्देश त्यांनी दिले. अद्यापही ४० हजार व्यापारांचा डेटा मनपाकडे आला नाही. सुमारे ७०० कोटींची वसुली बाकी आहे. एलबीटीचे लेखाशीर्ष बंद करणे आवश्यक आहे. या शिबिराच्या माध्यमातून वसुली होईल, त्यासाठी व्यापारी आणि अधिकारी सहकार्य करतील, असा विश्वास सभापती कुकरेजा यांनी व्यक्त केला. मनपा अर्थसंकल्पापूर्वी व्यापाऱ्यांनी मनपाकडून ज्या अपेक्षा व्यक्त केला त्याचा समावेश अर्थसंकल्पात करण्यात आला आहे. बाजार परिसरातील कामे तातडीने मार्गी लावण्याचे निर्देशही अधिकाऱ्यांना देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. पेट्रोल पंप वरील स्वच्छतागृहे नियमित खुली राहावी यासाठी आपण स्वत: पेट्रोलपंप मालकांना पत्र देणार असल्याचेही त्यांनी सांगितले.




## रमाई आवास योजनेच्या कामाला गती द्या : अभय गोटेकर

**गलिच्छ वस्ती निर्मूलन व घरबांधणी समितीची बैठक**

नागपूर महानगरपालिकेच्या वतीने नवबौद्ध घटकांसाठी राबविण्यात येणाऱ्या रमाई आवास योजनेच्या कामाला गती देण्याचे निर्देश गलिच्छ वस्ती निर्मूलन समिती सभापती अभय गोटेकर यांनी दिले. सोमवारी (ता.२५) मनपा मुख्यालयातील डॉ.पंजाबराव देशमुख सभागृहात समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती, त्याप्रसंगी ते बोलत होते.यावेळी समिती सदस्य परसराम मानवटकर, सदस्या लता काटगाये, निरंजना पाटील, कार्यकारी अभियंता (स्लम) डी.डी.जांभुळकर, कार्यकारी अभियंता राजेश राहाटे, नगररचना विभागाचे सहायक संचालक प्रमोद गावंडे, वैद्यकीय अधिकारी डॉ.विजय जोशी प्रामुख्याने उपस्थित होते. पुढे बोलताना अभय गोटेकर म्हणाले, रमाई आवास योजनेचे काम मागील काही दिवसांपासून संथगतीने सुरू आहे. त्याला गती देण्यात यावी. पुढील १५ दिवसानंतर रमाई आवास योजनेचे आवेदन पत्र वितरित करण्याचे निर्देश सभापती अभय गोटेकर यांनी दिले. प्रधानमंत्री आवास योजनेचे आवेदन पत्र ऑनलाईन पद्धतीने भरताना नागरिकांना त्रास होत आहे. नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही, याची काळजी घेत मनपाची प्रशासकीय यंत्रणा सज्ज ठेवा, असे निर्देश सभापती अभय गोटेकर यांनी दिले. महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य योजनेअंतर्गत निवास देता येऊ शकते काय, याबाबतचा आढावा सभापती अभय गोटेकर यांनी घेतला. त्यासंबंधी स्थावर विभाग, नासुप्र, एसआरएस या विभागांना जागेसाठी पत्र पाठविले असल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली. दक्षिण नागपूर मधील सावित्रीबाई फुले झोपडपट्टीधारकांना घर व पट्टे वाटप करण्याबाबत यावेळी बैठकीत चर्चा झाली.

## विद्यार्थ्यांची काळजी आणि सरंक्षण ही जबाबदारी शिक्षकांचीच - डॉ.वासंती देशपांडे

**महापालिकेच्या शिक्षण विभागाद्वारे कार्यशाळेचे आयोजन**

शाळेत आलेल्या विद्यार्थ्यांची काळजी घेणे आणि त्यांचे संरक्षण करणे ही जबाबदारी जेवढी पालकांची आहे, तेवढीच शिक्षकांची आहे. शालेय वेळेत पालक आपल्या पाल्याला आपल्या जबाबदारीवर सोडत असतो. त्यामुळे त्याचे संरक्षण करणे आपले कर्तव्यच आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याच्या बाल हक्क संरक्षण आयोगाच्या सदस्य डॉ. वासंती देशपांडे यांनी केले.नागपूर महानगरपालिकेद्वारे शुक्रवारी (ता.२२) महाल येथील राजे रघुजी भोसले नगर भवन येथे 'विद्यार्थी सुरक्षा कायदा' या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर नागपूर चाईल्ड लाईन या संस्थेच्या पूजा कांबळे, सहायक शिक्षणाधिकारी कुसूम चापलेकर प्रामुख्याने उपस्थित होत्या. पुढे बोलताना डॉ. वासंती देशपांडे म्हणाल्या, सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार विद्यार्थी संरक्षण कायदा सर्वत्र लागू करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र शासनाने यासंदर्भात विशेष लक्ष देण्यासाठी त्यानुसार २०१७ साली परिपत्रक काढले आहे. विद्यार्थ्यांच्या संरक्षणाची जबाबदारी ही शालेय वेळेत आपलीच असते, अशी माहिती त्यांनी मुख्याधापक आणि मनपाच्या शिक्षकांना दिली. शाळांमध्ये विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने काय उपाययोजना करावयाच्या याची माहिती डॉ.वासंती देशपांडे यांनी पीपीटीद्वारे दिली. शाळेच्या सर्व माध्यमांमध्ये व सर्व व्यवस्थापनाच्या प्राथमिक, माध्यामिक, उच्च माध्यमिक शाळांमध्ये तक्रार पेटी बसविण्यात यावी, शाळा व्यवस्थापनाने शाळेच्या सर्व प्रवेशद्वारांवर सीसीटिव्ही कॅमेरे बसविण्यात यावे, याशिवाय प्रवेशद्वारावर सुरक्षा रक्षक नेमण्यात यावा, अशीही सूचना त्यांनी केली. विद्यार्थी कोणत्याही दबावाला बळी पडू नये याकरिता त्याच्याशी सतत संवाद सुरू ठेवावा, अशा विद्यार्थ्यांचे तज्ज्ञांद्वारे समुपदेशन करावे. विद्यार्थ्याला शारीरिक अथवा मानसिक ईजा होईल, अशी शिक्षा शिक्षकांनी करू नये. यासारख्या उपाययोजना शाळेमध्ये राबविण्यात याव्यात, असेही डॉ.वासंती देशपांडे यांनी प्रतिपादित केले. कार्यशाळेसाठी शिक्षणाधिकारी संध्या मेडपल्लीवार यांनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाचे संचालन मधू पराड यांनी केले. आभार संध्या पवार यांनी मानले. यावेळी मनपाच्या शाळेतील सर्व शिक्षक आणि कर्मचारी उपस्थित होते.

# आम्ही घरापासून सुरू करू प्लास्टिकबंदी

**मनपा शाळेतील विद्यार्थ्यांचा संकल्प : मनपा-ग्रीन व्हिजीलद्वारे कार्यशाळा**

पुनर्प्रक्रिया आणि पुनर्वापर होणाऱ्या प्लास्टिकच्या व्यतिरिक्त दैनंदिन उपयोगातल्या प्लास्टिकच्या पिशव्यांचा उपयोग करणे आजपासून आम्ही कुटुंबातील प्रत्येक सदस्य बंद करू. यासाठी जनजागृतीचा वसा आजपासून स्वीकारू, असा संकल्प मनपा शाळेतील विद्यार्थ्यांनी पर्यावरण दिनाचे औचित्य साधून एकमुखाने केला.निमित्त होते नागपूर महानगरपालिका आणि ग्रीन व्हिजील फाऊंडेशनच्या वतीने महाल येथील राजे रघुजी भोसले नेताजी नगर भवन येथे आयोजित कार्यशाळेचे. 'प्लास्टिक प्रदूषणावर मात' हा कार्यशाळेचा विषय होता. मनपा शाळेतील विद्यार्थी, मुख्याध्यापक आणि शिक्षक सहभागी असलेल्या या कार्यशाळेत ग्रीन व्हिजीलच्या स्वयंसेवकांनी पथनाट्याच्या माध्यमातून आणि मूक अभियनातून प्लास्टिकच्या दुष्परिणामाबाबत विद्यार्थ्यांना बोलते केले. ग्रीन व्हिजील फाऊंडेशनचे कौस्तभ चॅटर्जी यांनी विद्यार्थ्यांशी प्रश्नोत्तराच्या माध्यमातून संवाद साधला. ग्रीन व्हिजीलच्या स्वयंसेवकांनी मूकनाट्यातून पर्यावरणाला धोका निर्माण होणाऱ्या कृती करून दाखविल्या. त्या कृती काय हे ओळखून विद्यार्थ्यांनी योग्य काय, ते अभिनयाच्या माध्यमातून करून दाखविले. सदर कार्यक्रमाला महापौर नंदा जिचकार, आमदार प्रा. अनिल सोले, शिक्षण सभापती प्रा. दिलीप दिवे, क्रीडा समितीचे उपसभापती प्रमोद तभाने, मनपातील भाजपच्या प्रतोद नगरसेविका दिव्या धुरडे, नगरसेविका श्रद्धा पाठक, शिक्षणाधिकारी संध्या मेडपल्लीवार, ग्रीन व्हिजील फाऊंडेशनचे संस्थापक कौस्तभ चॅटजी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आमदार प्रा. अनिल सोले म्हणाले, काही गोष्टींवर कायदेशीर बंदी आणणे आणि स्वयंसंकल्पाने काही गोष्टी आपल्या आयुष्यातून दूर करणे, यात बरेच अंतर आहे. ज्या गोष्टी पर्यावरण रक्षणात सहयोगी आहे अशा गोष्टींची सुरुवात मनपाने कायद्याची वाट न पाहता सुरू केली. नदी स्वच्छता अभियान, पर्यावरणपूरक गणेशोत्सव, इथेनॉलवर बसचे संचलन आदी विधायक गोष्टींची सुरुवात केली आणि नागरिकांनीही त्याला तितकाच प्रतिसाद दिला. कुठलेही चांगले विचार रुजविण्यात विद्यार्थ्यांची भूमिका मोठी असते. आपण स्वत:पासून प्लास्टिकबंदी सुरू केली तर आपण या चळवळीतील क्रांतिकारी बनाल, असेही ते म्हणाले. महापौर नंदा जिचकार म्हणाल्या, पुस्तकी शिक्षणापेक्षा अनुभवाचे शिक्षण महत्वाचे असते. मनपाच्या शाळा केवळ पुस्तकी ज्ञान देत नाही तर मूल्यशिक्षणही देते, हे अशा उपक्रमांतून सिद्ध होते. प्लास्टिकबंदी, वृक्षारोपण, नैसर्गिक स्त्रोत आदींचे जतन करणे हे आपले कर्तव्य आणि जबाबदारी आहे. ही जबाबदारी प्रत्येकाने ओळखायला हवी. यावेळी विद्यार्थ्यांनी प्लास्टिकबंदी करून पर्यावरणाचे संतुलन राखण्यास मदत करू, अशी प्रतिज्ञा घेतली. कार्यक्रमाचे संचालन श्रीमती मधु पराड यांनी केले. आभार शिक्षणाधिकारी संध्या मेडपल्लीवार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मनपा शिक्षण विभागाचे कर्मचारी वृंद आणि ग्रीन व्हिजील फाऊंडेशनचे सुरभी जैस्वाल, मेहुल कोसुरकर, कल्याणी वैद्य, बिष्णुदेव यादव, शीतल चौधरी, विकास यादव, अभय पौनीकर, कार्तिकी कावळे, अमोल भलम, शांतनू शेळके, आयुष शेळके, दादाराव मोहोड आदींनी सहकार्य केले.



## चिल्ड्रेन ट्राफिक पार्कमध्ये साधला नागरिकांशी संवाद

पर्यावरण दिवसाच्या निमित्तान नागपूर महानगरपालिका आणि ग्रीन व्हिजीलच्या स्वयंसेवकांनी सायंकाळी धरमपेठ परिसरातील चिल्ड्रेन ट्राफिक पार्क येथे नागरिकांशी संवाद साधला. 'प्लास्टिकचे दुष्परिणाम' या विषयांवर स्वयंसेवकांनी नागरिकांची मते जाणून घेतली. प्लास्टिकबंदीसाठी काय करायला हवे यासंदर्भात नागरिकांच्या सूचना नोंदवून घेतल्या. सुमारे तीन तास चाललेल्या या संवाद कार्यक्रमाच्या माध्यमातून सुमारे ३५० नागरिकांशी संवाद साधण्यात आला. अनेक नागरिकांनी या उपक्रमाचे कौतुक करत स्वत:पासून प्लास्टिकबंदी करण्याचा संकल्प केला.